**प्रेसनोट**

जा.क्र.          /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– ९/०५/२०१८

**" रस्त्याचे वादावरून जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"**

पोलीस ठाणे आंधळगाव अंतर्गत आकोलाटोला येथिल आरोपी नामे श्रावण सदाशिव बाहे, वय ४५ वर्ष, रा. अकोलाटोला ता. मोहाडी, जिल्हा भंडारा याने हरीराम मारोती बाहे याचे डोक्यावर लाखडी काठीने मारल्याचे सदोष मनुष्यवध सदराखाली आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक ९.०५.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश वर्ग २ श्री. सचिन बी. भंसाली सा. यांनी आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १९.०७.२०१५ ला तक्रारदार श्री. मच्छिंद्र हरीराम बाहे, वय २७ वर्ष रा. आकोलाटोली यांनी पोलीस ठाणे आंधळगाव येथे येवुन तोंडी तक्रार दिली की, सकाळी १०.०० वा. दरम्यान घरी हजर असता चुलत भाउ विजय बाहे हा ट्रक्टर घेवुन घरा जवळ आला व शेतात चिखल करण्याकरीता ट्रक्टर जाण्यास भाउ क्रिष्णा व गजानन यांना खाली जागेतुन रस्ता मागीत होता. गावातील सरपंच श्री. तितीरमारे यांचे मध्येस्थिने जाण्यास मार्ग देण्यात आला. तेवढयात तक्रारदार याचे वडिल हरीराम बाहे घराचे बाहेर येवुन सरपंच श्री. तितीरमारे यांना सांगत होते की, त्यांचे संडासाकडे जाण्या येण्याचे मार्गावर पतीराम बाहे काडया ठेवतात त्यामुळे जाण्या येण्यास अडथळा निर्माण होतो, तो रस्ता हरीराम बाहे सरपंच यांना दाखवित असता सदर जागेवरून श्रावण बाहे, बंडु बाहे, विजय बाहे, जिवन बाहे यांनी हरीराम बाहे, गोरखनाथ बाहे, धर्मदास बाहे व तक्रारदार यांना मारपिठ केली व श्रावण बाहे याने बासाची काडी हातात घेवुन तक्रारदार याचे वडिल हरीराम बाहे यांचे डोक्याचे मागील बाजुस काडीने मारले त्यामुळे डोक्याचे मागील बाजुने रक्तस्त्राव होत होता त्यामुळे सरपंच श्री. तितीरमारे यांचे मोटार सायकलने पो.स्टे. आंधळगाव येथे घेवुन गेले त्याचे सोबत तक्रार हे येवुन झालेल्या बादाबाबत पो.स्टे. तक्रार देत असता जख्मी हरीराम यांना उपचाराकरीता दवाखाण्यात नेले त्या अहवालावरून व तक्रारदार यांचे तक्रारीवरून पो.स्टे

आंधळगाव येथे अप.क्र. ४३/१५ कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक मनोज काळबांडे यांनी तपास सुरू केला. त्याच दिवशी जख्मी हरीराम बाहे यांचा उपचारा दरम्यान लक्ष हॉस्पीटल भंडारा येथे मृत्यु झाला. प्राप्त माहितीवरून गुन्हयात मृतकाचे शवविच्छेदन करून कलम ३०२ भादवि ची वाढ केली. सदर गुन्हयात आरोपी नामे १) श्रावण सदाशिव बाहे, वय ४७ वर्ष, २) बंडु दौलत बाहे, वय ४७ वर्ष, ३) विजय संपत बाहे, वय ३९ वर्ष, ४) जिवन झाडु बाहे, वय ३९ वर्ष सर्व रा. आकोलाटोला यांना अटक करून आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने खुन व दुखापत करणे या आरोपा खाली दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ५१/१५ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. सचिन बी. भंसाली सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ९.०५.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे** श्रावण सदाशिव बाहे, वय ४७ वर्ष, रा. आकोलाटोला ता. मोहाडी, जिल्हा भंडारा याचे विरूध्द **कलम ३०४ भादवि अन्वये** दोषसिध्द झाल्याने **सात वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रूपये दंड, दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, अरून गुरनुले, ठाणेदार पोलीस ठाणे आंधळगाव यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, सदाराम रंगारी/७६९ व पो.ना. रवि सपाटे/९५१ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(प्रनती लांजेवार)
म. पोलीस उपनिरीक्षक
माहिती कक्ष, भंडारा
दुरध्वनी क्र.०७१८४२५२६२

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.